नि.दि.दा.क्र. १२१/२०२३ नि. क्र. २५

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास वादी तर्फे वकील श्री. अढाऊ यांच्याकडून**

२५. माझ्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकुर मी वाचून पाहिले आहे. ते माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर लिहीलेला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र.२५ देण्यात येते.

२६. आता मला यादी निशाणी २४ सोबत अनु.क्र.१ वर दाखल मी, माझ्या बहिणी प्रतिवादी क्र.४ व ५ तसेच माझी आई गिताबाई यांनी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या हक्कात दिनांक २४.०९.२०२१ रोजी करून दिलेल्या नोंदणीकृत हक्कसोड पत्र दाखविले. त्यावर माझी, माझ्या बहिणी प्रतिवादी क्र.४ व ५ तसेच माझी आई व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या सह्या व अंगठा आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. यास **नि.क्र.२६** देण्यात येते. आता मला यादी निशाणी २४ सोबत अनु.क्र. २ वर दाखल दिवाणी दावा क्र. ५५/२०१७ मधील नि.क्र.१ व त्यावरील दिनांक ०९.०९.२०२३ रोजीच्या आदेशाची व अवार्डची सत्य प्रत दाखविली. यास **नि.क्र.२७** देण्यात येते. आता मला यादी निशाणी २४ सोबत अनु.क्र. ३ वर दाखल दावा मिळकत सर्व्हे क्र.६०/१ च्या ७/१२ उता–याची ऑनलाईन प्रत दाखविली. यास **नि.क्र.२८** देण्यात येते. आता मला यादी निशाणी २४ सोबत अनु.क्र.४ वर दाखल दावा मिळकत सर्व्हे क्र.४८ च्या ७/१२ उता–याची ऑनलाईन प्रत दाखविली. यास **नि.क्र.२९** देण्यात येते. आता मला यादी निशाणी २४ सोबत अनु.क्र.५ वर दाखल दावा मिळकतीची कर पावती दाखविली. यास **नि.क्र.३०** देण्यात येते.

**सरतपास संपला**

**उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.10.17 17:24:10 +0530

ठिकाण –कामठी (राजेश र. शेरेकर)

दिनांक –१७/१०/२०२४ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.